**ठळक बातम्या**

- ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांच्यासह ४ मान्यवरांची राष्ट्रपतींकडून राज्यसभेवर नियुक्ती
- बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांबाबत सर्व राज्य तसंच केंद्रशासित प्रदेशांनी त्वरित कडक कारवाई करावी, असे केंद्र सरकारचे निर्देश
- भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचा परतीचा प्रवास उद्या सुरु होणार

**आणि**

- विम्बल्डन टेनिस स्पर्धेचा अंतिम सामना आज अग्रमानांकित जेनिक सिन्नर आणि दोन वेळचा गतविजेता कार्लोस अल्काराझ यांच्यात रंगणार

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांची राज्यसभेसाठी सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. निकम यांच्यासह समाजसेवक सी. सदानंदन मास्टर, माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला, इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. मीनाक्षी जैन यांचीही नियुक्ती झाल्याची अधिसूचना गृह मंत्रालयानं आज जारी केली. संविधानाच्या अनुच्छेद ८० अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करत राष्ट्रपतींनी ही नियुक्ती केली आहे.

उज्ज्वल निकम यांनी मुंबईवर दहशतवादी हल्ला प्रकरणात सरकारी वकील म्हणून काम केलं होतं. सदानंद मास्टर हे केरळचे असून त्यांनी शिक्षण क्षेत्रात मोलाचं योगदान दिलं आहे. हर्षवर्धन श्रृंगला यांनी अमेरिका, बांग्लादेश आणि थायलंड इथं भारताचे राजदूत म्हणून काम केलं आहे. तसंच ते २०२३ मध्ये भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या G 20 शिखर परिषदेचे मुख्य समन्वयक म्हणून कार्यरत होते. डॉ. मीनाक्षी जैन या दिल्लीच्या गार्गी महाविद्यालयात इतिहासाच्या सहयोगी प्राध्यापक आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या चारही मान्यवरांचं समाजमाध्यमावरून अभिनंदन केलं आहे. उज्ज्वल निकम यांची कायद्याच्या क्षेत्रातली आणि संविधानाप्रती असलेली निष्ठा अनुकरणीय आहे. ते यशस्वी वकील असून अनेक महत्त्वाच्या खटल्यांमध्ये न्याय मिळवून

देण्यासाठी आघाडीवर राहिले आहेत. अशा शब्दांत प्रधानमंत्र्यांनी निकम यांचं अभिनंदन केलं. उज्जवल निकम यांनी प्रतिक्रीया दिली.

**.... होल्ड- बाईट- उज्जवल निकम- -**

**<><><><>**

बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांबाबत सर्व राज्य तसंच केंद्रशासित प्रदेशांनी त्वरित कडक कारवाई करावी असे निर्देश केंद्र सरकारनं दिले आहेत. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी सर्व मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे हे निर्देश दिले आहेत.

देशभरात बनावट खतांचं वितरण, खतांचा काळा बाजार  तसंच, खतांच्या गोण्यांवर खोटी लेबलं लावण्यासारख्या अवैध गोष्टींना आळा घालायच्या उद्देशानं हे पत्र कृषीमंत्र्यांनी लिहिलं आहे. कृषीक्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थैर्य यावं, याकरता त्यांना उत्तम दर्जाची खतं योग्य वेळी आणि रास्त भावात मिळणं गरजेचं आहे, असं चौहान यांनी म्हटलं आहे. त्यामुळे खतांचा पुरेसा साठा जागोजागी आणि गरजेच्या ठिकाणी उपलब्ध करून देणं ही राज्य सरकारांची जबाबदारी असल्याचं त्यांनी सांगितलं आहे. याकरता दोषी आढळलेल्यांचे खतवितरण परवाने रद्द करून राज्य सरकारांनी गुन्हे दाखल करावेत, असं चौहान यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

भारतीय आयुर्वेद उपचार पद्धतीतल्या शल्यक्रियेचे जनक आचार्य सुश्रुत यांच्या जयंती निमित्त नवी दिल्ली इथं अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेतर्फे तीन दिवसीय ‘शल्यकॉन २०२५’ हा राष्ट्रीय परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. आज परिसंवादाला प्रारंभ झाला असून उद्या मुख्य सोहळ्यात केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अखिल भारतीय आयुर्वेद संस्था तिच्या स्थापनेपासून जगभरात आयुर्वेदाचा प्रचार करण्यासाठी समर्पित असून, यंदाच्या शल्यकॉन परिसंवादात आयुर्वेदाची मूलतत्त्व आणि आधुनिक शस्त्रक्रिया यांचं एकत्रीकरण करण्यावर भर देण्यात येत आहे. आजच्या चर्चासत्रात थेट शस्त्रक्रिया प्रात्यक्षिके सादर होत आहेत. नवोन्मेष, एकात्मता आणि प्रेरणा या संकल्पनेवर परिसंवाद कार्यक्रमात पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम असणार आहे.

**<><><><>**

नागपूरमधे धंतोली इथं प्रादेशिक न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या, नवीन असलेल्या सात मजली इमारतीचं भूमीपूजन आज मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. नव्यानं सुरु झालेल्या ३ राज्यस्तरीय प्रकल्पांचं लोकार्पणही ऑनलाईन पद्धतीनं मुख्यमंत्र्यांनी केलं.

**<><><><>**

यवतमाळ इथं प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख माजी आमदार बच्चू कडू यांची सातबारा कोरा यात्रा सुरू आहे. यात्रेच्या आज सातव्या दिवशी बच्चू कडू आणि पदयात्रेत सहभागी शेतकरी- शेतमजुरांनी डोळ्यावर काळ्या पट्ट्या बांधून सहभाग नोंदवला.

शेतकरी, दिव्यांग, भोई, मेंढपाळ यांच्यावरच्या अन्यायाकडे राज्य शासनाचं लक्ष वेधण्यासाठी ही यात्रा काढण्यात आली असल्याचं बच्चू कडू यांनी सांगितलं.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २७ जुलैला सकाळी अकरा वाजता आकाशवाणीच्या ‘मन की बात’ कार्यक्रमातून जनतेसमोर आपले विचार मांडणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२४ वा भाग असणार आहे. हा कार्यक्रम आकाशवाणीसह दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून प्रसारित होईल. या कार्यक्रमासाठी महत्त्वाच्या मुद्द्यांबाबत जनतेच्या सूचना मागवण्यात येत असून येत्या शुक्रवारी दिनांक २५ जुलै २०२५ पर्यंत नागरिकांना आपलं मनोगत माय जी ओ व्ही डॉट इन संकेतस्थळ तसंच नि:शुल्क दूरध्वनी क्रमांक एक आठ शून्य शून्य - अकरा - सात आठ शून्य शून्य यावरही व्यक्त करता येईल.

**<><><><>**

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचा परतीचा प्रवास उद्या सुरु होईल. ग्रुप कॅप्टन शुक्ला यांच्यासह आणखी ३ अंतराळवीरांना घेऊन ॲक्सियॉम - फोर हे अंतराळ यान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरुन भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी साडेचार वाजता रवाना होईल. हे यान येत्या मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास पृथ्वीवर उतरेल. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली. शुभांशु शुक्ला यांनी भारतासाठी अंतराळात एकूण सात प्रयोग केले आहेत.

**<><><><>**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेचा अंतिम सामना आज अग्रमानांकित जेनिक सिन्नर आणि दोन वेळचा गतविजेता कार्लोस अल्काराझ यांच्यात रंगणार आहे. फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेतही अजिंक्यपदासाठी अंतिम लढत या दोघात झाली होती. तेव्हा अल्काराझ हिरवळीवरच्या खेळातही वर्चस्व सिद्ध करणार ? की सिन्नर फ्रेंच स्पर्धेतल्या पराभवाचा वचपा काढणार ? याबद्दल टेनिसप्रेमींमधे उत्सुकता आहे.

महिला एकेरीच्या काल झालेल्या एकतर्फी अंतिम सामन्यात पोलंडच्या इगा स्वियातेकनं अमेरिकेच्या अमांडा अनिसिमोवाला केवळ ५७ मिनिटांत ६-०, ६-० असं हरवून आपलं सहावं ग्रँड स्लॅम विजेतेपद आणि विम्बल्डनमधलं पहिलं विजेतेपद मिळवलं. ही स्पर्धा जिंकणारी ती पहिली पोलिश महिला ठरली आहे.

दरम्यान, ज्युलियन कॅश आणि लॉयड ग्लासपूल यांनी विम्बल्डन २०२५ मध्ये इतिहास रचला. १९३६ नंतर पुरुष दुहेरीचं विजेतेपद जिंकणारी ही पहिली, पूर्ण ब्रिटिश जोडी ठरली आहे. या जोडीनं ऑस्ट्रेलियाच्या रिंकी हिजिकाटा आणि नेदरलँड्सच्या डेव्हिड पेलला २-० असं पराभूत केलं. ८९ वर्षांपूर्वी पॅट ह्यूजेस आणि रेमंड टकी या ब्रिटिश जोडीनं पुरुष दुहेरीचं  विजेतेपद पटकावलं होतं.

**<><><><>**

भारताच्या महिला क्रिकेट संघानं इंग्लंडविरुद्धची टी-ट्वेंटी मालिका तीन - दोन अशा फरकानं जिंकून ऐतिहासिक विजय नोंदवला आहे.

महिला क्रिकेटमध्ये इंग्लंडविरुद्ध भारताचा हा पहिलाच टी-ट्वेंटी मालिका विजय आहे. मालिकावीर म्हणून भारताची गोलंदाज नल्लापुरेड्डी श्री चराणी हिला गौरवण्यात आलं. काल, बर्मिंगहॅम इथं झालेला मालिकेतला पाचवा अंतिम सामना इंग्लंडच्या महिला संघानं पाच गडी राखून जिंकला. तथापि, याआधीच भारतानं तीन-एक अशी विजयी आघाडी घेतलेली होती.

कर्णधार हरमनप्रीत कौर सर्वाधिक सामने खेळणारी भारतीय महिला क्रिकेटपटू ठरली आहे. हा तिचा ३३४ वा आंतरराष्ट्रीय सामना होता.

**<><><><>**

अँडरसन-तेंडुलकर क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी यजमान इंग्लंड संघ आज भारताविरुद्धचा आपला दुसरा डाव, बिनबाद २ धावांवर सुरु करेल. खेळ साडेतीन वाजता सुरू होईल.

<><><><>

स्पेनमधे माद्रीद इथं आयोजित तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या चौथ्या टप्प्यात काल भारतानं दोन रौप्य आणि एका कांस्य पदकाची कमाई केली.

<><><><>

मध्य महाराष्ट्राच्या घाटमाथा परिसरात, दक्षिण कोकण आणि विदर्भात विजांच्या कडकडाटासह आणि जोराच्या वाऱ्यासह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

//<><><><>//